महाराष्ट्र राज्य महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण
कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर- ४१६ ००४.
Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary
Kolhapur Divisional Board, Rajendranagar, Kolhapur - 416 004.

webside : **www.sscboardkolhapur.in** & **www.mahahsscboard.gov.in**
Phones: Chairman 2690829 [O] 2690679 [R], Secretary 2691405 [O] 2656044 [R].
PBX - 0231-2696101, 2696102, 2696103 FAX : [0231] 2690758 **E-Mail: divsec.kop@ gmail.com**

क्र.कोविमं/इ.१२वी गोपनीय/ 3266
कोल्हापूर- ४१६ ००४.
दिनांक:२४.०२.२०१९

प्रति,
प्राचार्य,
सातारा/सांगली/कोल्हापूर
जिल्ह्यातील क.महाविद्यालय

विषय:-उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०१९ च्या उत्तरपत्रिका तपासणीस व नियमन करण्यावर टाकलेल्या बहिष्काराबाबत

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रूवारी/मार्च २०१९ च्या महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने उत्तरपत्रिका तपासणीवर व नियमन करण्यावर बहिष्कार टाकलेला आहे असे निवेदन या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

उपरोक्त प्रकरणी परीक्षक /नियामक यांना उत्तरपत्रिका दिलेल्या आहेत. त्या उत्तरपत्रिका शाळा/क.महाविद्यालय प्रमुख यांनी उत्तरपत्रिकांचे गठ्ठे स्विकारुन ते प्रचलीत पध्दतीप्रमाणे संबधीत परीक्षक/नियामक यांना परीक्षण /नियमन करणेसाठी देणेत यावे.

उत्तरपत्रिका तपासणी व नियमन करण्याच्या कामावर शिक्षकांनी बहिष्कार टाकलेमुळे काही शिक्षक उत्तरपत्रिका तपासणीस/स्विकारणेस नकार दिल्यास अशा शिक्षकांचे आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित पाहता उत्तरपत्रिका तपासणीबाबत उद्‌बोधन करुन उत्तरपत्रिका तपासणीसाठी प्रवृत्त करुन उत्तर पत्रिका देण्यात याव्यात.

तरीही शिक्षकांनी नकार दिल्यास अशा उत्तरपत्रिका आपल्या कस्टडीत सुरक्षित ठेवण्यात याव्यात व अशा शिक्षकांची परीक्षक नंबरसह व विषयासह माहिती या कार्यालयास सादर करावी.

बहिष्काराबाबत समितीशी वाटाघाटी झालेनंतर संबधितांना उत्तरपत्रिकांचे गठ्ठे तपासणीसाठी देणेत येवून पुढील कार्यवाही आपले मार्फत करणेत यावी.

तसेच उत्तरपत्रिका गठ्ठे कोणत्याही परिस्थितीत मंडळ कार्यालयाकडे अथवा सबंधीत कस्टडीकडे परत पाठविणेत येवू नयेत याची नोंद घ्यावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर